## Press Clippings

Publication : **Navshakti**
Edition : Mumbai
Date : Sunday, April 24, 2016
Page No. : 3


# प्राचीन नाणी, नोटा आणि स्टॅम्प्स यातून संस्कृतीचे प्रतिबिंब उमटते



मुंबई, शनिवार (वृत्तसंस्था) - इतिहासाच्या अवलोकनाची चलन हे महत्वपूर्ण माध्यम असून नाणी, नोटा, स्टॅम्प्स यातून त्या त्या काळातील आपली संस्कृती प्रतिबिंबित होते असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले.

मिन्टेज वर्ल्ड डॉट कॉम या ऑनलाईन म्युझियमच्या संकेतस्थळाचे उद्घाटन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते कफ परेड येथील एक्सपो सेंटर येथे करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी अल्ट्रा मीडिया आणि मिन्टेज वर्ल्डचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुशील-कुमार अग्रवाल, कझाद तोडिवाला उपस्थित होते.

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मत**

**मिन्टेज वर्ल्ड या ऑनलाईन म्युझियमचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन**

मुख्यमंत्री पुढे म्हणाले, सिंधू संस्कृतीमध्ये नाण्यांना विशेष महत्व होते. त्यावेळीही नाण्यांच्या माध्यमातून आवश्यक देवाण-घेवाण व्हायची. नाण्यांचे जतन, संरक्षण हे महत्वपूर्ण कार्य आहे. प्रत्येकाला इतिहासाची माहिती असायला हवी. इतिहास वाचून व त्यापासून बोध घेऊन पुढे जाण्याची गरज आहे। या क्षेत्रात काम करणाऱ्यांसाठी मिन्टेज वर्ल्डच्या माध्यमातून नवा प्लॅटफॉर्म तयार झाला असल्याचे ते यावेळी म्हणाले. शुक्ला डे च्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या नाणी, नोटा व स्टॅम्प्सच्या प्रदर्शनाची पाहणी यावेळी मुख्यमंत्र्यांनी केली.

मिन्टेज वर्ल्ड ऑनलाईन म्युझियमच्या माध्यमातून नाणी, नोटा आणि स्टॅम्प्स यांना एकाच छताखाली आणण्याचा प्रयत्न जगात पहिल्यांदाच करण्यात आला असून संग्रह करणाऱ्यांसाठी, विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी तसेच छंद जोपासण्यासाठी हे संकेत स्थळ उपयोगी असल्याचे सुशीलकुमार अग्रवाल यांनी सांगितले.